# मुख्य लेखा परिक्षक

यांचा

# लेखा परिक्षण अहवाल

## सन 2013 - 14

## सन 2014 - 15

**(मनपा अधिनियम 2011 क. 106 नुसार)**

O/C

अहमदनगर महानगरपालिका
लेखापरीक्षण विभाग
जा.क्र. २४ दि. १५।५।२०१५

प्रति,
मा.सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका अहमदनगर

महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011 चे कलम 106 अन्वये प्राप्त अधिकारान्वये तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय दि.6-7-2005 नुसार लागू असणा-या राष्ट्रीय म्युन्सिपल अकाउंटींग मॅन्युअल चे प्रकरण 32, परि 32.4 नुसार सन 2013-14 च्या वार्षिक लेख्यांचे लेखा परिक्षण करण्यात आले.

त्या अनुषंगाने उक्त तरतुदीनुसार महानगरपालिका अहमदनगर च्या सन 2013-14 चा वार्षिक लेख्यांवरील मुख्य लेखा परिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल व सन 2014-15 चा "मुख्य लेखा परीक्षक" यांचा लेखा परीक्षण अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्याकरीता सविनय सादर करण्यात येत आहे. सदर अहवालावरील आवश्यक त्या कार्यवाहीअंती क 106 नुसार लेखा परिक्षण अहवाल महासभेसमोर सादर करण्यात यावा.

मुख्यलेखापरीक्षक
अहमदनगर महानगरपालिका
अहमदनगर

o/c

प्रत:-

1) मा.आयुक्त : माहितीस्तव
2) मा.नगरसचिव : यांना प्रत देवून सूचित करण्यात येते की, प्रस्तुत मुलेप-लेखा परीक्षण अहवाल सन 2013-14 व 2014-15 आगामी स्थायी समितीसमोर सादर करण्यात यावा.

प्रत मिळाली
१५।५।१५

१५।५।१५

## लेखा परीक्षण कालावधीतील कार्यरत सन्माननीय पदाधिकारी व अधिकारी -

| अ.न. | पदाधिकारी व अधिकारी नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | मा.आ.श्री.संग्राम जगताप | महापौर | 1/4/2013 ते 31/3/2015 |
| 2 | मा.श्री.किशोर डागवाले | सभापती स्थायी | 1/4/2013 ते 31/1/2015 |
| 3 | मा.श्री.गणेश भोसले | सभापती स्थायी | 1/2/2015 ते 31/3/2015 |
| 4 | श्री. विजय कुलकर्णी | आयुक्त | 1/4/2013 ते 31/3/2015 |
| 5 | श्री. विलास वालगुडे | अतिरिक्त-आयुक्त | 1/11/2014 ते 31/3/2015 |
| 6 | श्री.महेश डोईफोडे | उपायुक्त (सा) | 24/8/2010 ते 21/8/2014 |
| 7 | श्री. अजय चारठाणकर | उपायुक्त (सा) | 21/8/2014 ते 31/3/2015 |
| 8 | श्री. भालचंद्र बेहरे | उपायुक्त (कर) | 1/4/2013 ते 31/3/2015 |
| 9 | श्री. प्रदीप शेलार | मु.ले.अ. | 6/7/2010 ते 10/7/2014 |
| 10 | श्री. हितेश विसपुते | मु.ले.अ. | 10/7/2014 ते 31/3/2015 |

## अस्वीकृती प्रमाणपत्र

1) अहमदनगर महानगरपालिकेत पूर्वीपासून पूर्व लेखा परीक्षण पध्दती आंमलात असून प्रचलित पध्दतीनुसार महापालिकेअंतर्गतच्या विविध विभागांनी सन 2013-14 व 2014-15 या वित्तीय वर्षात सादर केलेले प्रस्ताव अभिलेखे, देयके व माहितीच्या आधारे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.
2) जी माहिती, अभिलेखे महापालिकेच्या विभाग प्रमुखांनी लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही, सादर केली नाही तसेच लेखा परीक्षणाचे आक्षेप/त्रुटी/अभिप्राय अधिक्रमित करून सक्षम प्राधिकारी यांनी विविध मान्यता प्रदान केल्या त्या संबंधातील अनियमितता/अपहार/अफ़रातफरीस लेखा परीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| | पृष्ठ क्र. |
| भाग-1 : सन 2013-14 च्या वार्षिक लेख्याचा लेखा परिक्षण अहवाल | 1 ते 6 |
| भाग-2 : सन 2014-15 लेखा परिक्षण अहवाल | 7 ते 14 |
| परिशिष्ठ 1 : निदर्शनास आलेल्या त्रुटी / अनियमितता | 15 ते 240 |
| परिशिष्ठ 2 : पालिकेस येणे असणा-या थकबाकीच्या रकमा | 241 |
| 3 : जमा, खर्च, मत्ता / दायित्व वर्गीकरण | 242 |
| 4 : विविध योजना, कामे, खर्च यास मंजुरी | 243 |
| 5 : निधीचा योग्य उद्दीष्टावर विनियोग | 244 |
| 6 : विशेष निधी | 245 |
| 7 : मत्ता / भांडार साहित्याची पडताळणी | 246 |
| 8 : कर्ज / अग्रीमे | 247 |
| 9 : भांडार वस्तू खरेदी, अंतर्गत नियंत्रण | 248 |
| 10 : भ.नि.नि., शासकीय कर | 249 |

## भाग - 1

## सन 2013-14 वार्षिक लेख्यांचे लेखा परीक्षण:-

1.0 अहमदनगर महानगरपालिकचे सन 2013-14 या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा हा महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011 चे कलम 94 नुसार विहीत मुदतीत सादर न करता एक वर्ष विलंबाने सादर करण्यात आलेला आहे. तसेच म.शा.नगर विकास विभाग शासन निर्णय दि.6.7.2005 स्थित शासन सूचनांनुसार राष्ट्रीय मनपा लेखा संहितेतील नमुद विहीत नमुन्यात सदरचे वार्षिक लेखे हे व्दिनोंद पध्दतीने उपर्जित तत्वावर ठेवण्यात आलेले नाहीत.

सदरचे वार्षिक लेखे हे नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नमुन्यात ठेवण्यात आले असून सदर तरतूदी हया केवळ नगरपालिकांकरीत लागू असून अद्याप देखील उक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

प्रस्तुत वार्षिक लेख्यासोबत रोख रकमेचे विवरणपत्र, कॅश फ्लो विवरणपत्र मत्ता व दायित्व विवरणपत्र व वित्तीय निर्देश/टिप्पणी वार्षिक विवरणपत्रासोबत सादर करण्यात आलेले नाही.

2.0 सन 2013-14 च्या वार्षिक विवरण पत्राच्या तपासणीअंती खालील बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | :- 260167141 |
| एकूण जमा रक्कम | :- 2326610861 |
| शिलकेसह एकूण जमा | :- 2586778002 |
| एकूण खर्च | :- 2876742853 |
| अखेरची शिल्लक | :- (-)289964851 |

सन 2013-14 च्या वार्षिक लेख्याच्या उपरोक्तनमुद गोषव-यावरून असे निदर्शनास येते की, सन 2014-15 ची अखेरची शिल्लक ही (-)28,99,64,850.68रू. असून उपलब्ध रोख रकमेपेक्षा (-)28,99,64,850.68रू. रकमेने जादा खर्च झालेला आहे.

शिलकेसह एकूण जमा रू.258.67 कोटी असताना रू.287.67 कोटी खर्च कसा करण्यात आला? एकूणच संपूर्ण वार्षिक लेखा हा चुकीचा सादर करण्यात आल्याचे दिसून येते.

सन 2013-14 चे अंतिमत: मंजुर अर्थसंकल्पिय अनुदान व विविध विकास योजनांच्या रोख नोंदवहयांवरून प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमांची प्रत्यक्ष खात्री करून मॅन्युअली रोख नोंदवहया, अभिलेख्यांवरून अचूक व परिपूर्ण वार्षिक लेखे मुख्य लेखा अधिकारी व मा. आयुक्त यांनी मा.स्थायी समितीस सादर करून अनुपालन सादर करावे.

## 3.0 <u>महसुली जमा :लेखा परिक्षण</u>

| जमा रकमा :- | अपेक्षित जमा | प्रत्यक्ष जमा | कमी जमा |
|---|---|---|---|
| अ) मनपा कर व दर :- | 971174000 | 78726506 | (-)183908937 |
| 1) वसुली विभाग :- | 356406000 | 169335992 | (-)187070007 |
| 2) अग्निशमन :- | 762000 | 6311405 | (+)5549405 |
| 3) इतर जमा :- | 614006000 | 609404648 | (-)4601351 |

मनपा दर व करांची वसुली विचारात घेता वसुली ही केवळ 80% असल्याचे दिसून येते. अग्निशमन विभागाची वसुली अर्थसंकल्पिय तरतुदीतील अपेक्षित उत्पन्नापेक्षा 8 पटीने जास्त असून वसुली विभागाची वसुली ही 35.64 कोटी रू. अर्थसंकल्पिय अंदाजाऐवजी प्रत्यक्ष रू.16.93 कोटी असून वसुलीचे प्रमाण हे केवळ 47% असल्याचे दिसून येते.

**ब) कराव्यतिरिक्त उत्पन्न :-**

अपेक्षित :- 4,31,000/-
प्रत्यक्ष :- 3,22,275/-
फरक :- 1,08,725/-

कराव्यतिरिक्त उत्पन्नाचे प्रमाण देखील कमी असून अपेक्षित उत्पन्नाच्या तुलनेत केवळ 74% आहे.

**क) मालमत्ता व सेवापासूनचे उत्पन्न :-**

अपेक्षित :- 19,05,70,000/-
प्रत्यक्ष :- 7,34,51,644/-
फरक :- 11,71,18,355/-

महानगरपालिकेची मालमत्ता व पुरविण्यात येणा-या सेवांपासूनचे उत्पन्न देखील अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी असून उत्पन्नाचे प्रमाण केवळ 38% आहे.

एकूणच तीनही <u>(अ,ब व क)</u> उत्पन्नाच्या स्त्रोतांची परिस्थिती पाहिती असता मनपाचे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार अपेक्षित उत्पन्नाच्या तुलनेत प्रत्यक्ष उत्पन्नाचे प्रमाण हे केवळ 50% असल्याचे दिसून येते. अग्निशमन विभाग वगळता इतर सर्व विभाग, प्रामुख्याने वसुली विभाग, प्रभाग हे वसुलीच्या बाबतीत तत्पर नसून वसुलीबाबत उदासिनता दिसून येते.

सामान्य कर, पाणीपट्टी वसुलीचे प्रमाणही अर्थसंकल्पिय अपेक्षित उत्पन्नाच्या तुनलेत कमी असल्याचे दिसून येते. आयुक्त, उपायुक्त (कर) यांनी नाविन्यपूर्ण योजना अंमलात आणून, वसुलीबाबत नियोजनपूर्वक कार्यक्रम आखून प्रत्येक वसुली लिपिक, प्रभाग अधिकारी यांनी उद्दिष्ट देवून वसुलीच्या कामी प्रभावी

उपाययोजना करणे गरजेचे ठरते. प्रसार माध्यमाद्वारे व्यापक प्रचार व प्रबोधन करून नागरिकांमध्ये कर भरणा करणेबाबत जनजागृती करणे गरजेचे ठरते. तसेच वसुलीकामी हयगय निष्काळजीपणा होत असल्यास वेळीच प्रशासनिक कार्यवाही केल्यास वसुलीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

वसुलीचे अत्यल्प असलेले प्रमाण व योजनांना मंजुरी देताना अर्थसंकल्पिय मंजुरी अनुदानाच्या मर्यादेत मंजुरी दिली जात असल्याने मनपाच्या दायित्वात वाढ होत असल्याचे दिसून येते. दायित्व कमी करण्यासाठी अपेक्षित उत्पन्नानुसार 100% वसुली होणे व वस्तुस्थितीनुसार अर्थसंकल्पिय तरतुदी करणे आवश्यक ठरते मा.आयुक्त यांनी स्थानिक संस्थेचा प्रशासकीय व विभाग प्रमुख या नात्याने संबंधित यंत्रणा व त्यांचे अधिनस्त असणारे नियंत्रण अधिकारी, शाखा / विभाग प्रमुख यांचेवर नियंत्रण असण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती प्रशासनिक कार्यवाही करणे गरजेचेठरते.

ड) **<u>अनुदाने / अंशदाने</u>** :-

अपेक्षित :- 16,60,26,000/- रू.
प्रत्यक्ष :- 2,08,15,765/- रू.
फरक :- (-) 14,40,60,235/- रू.

अपेक्षित उत्पन्नाच्या तुलनेत अनुदाने व अंशदानाचे प्रमाण देखील नगण्य असून ते केवळ 12.5% असल्याचे दिसून येते. एकूणच प्राप्त अनुदानाचे नगण्य प्रमाण पाहता योजनांची अंमलबजावणी विहीत मुदतीत न होणे, मुदतीत कामे पार न पडणे, नियोजनाचा अभाव यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र वेळीच सादर न झाल्याने त्याचे पर्यावसन निधी प्राप्त न होण्यात होते. सबब अपेक्षित अर्थसंकल्पिय तरतुदींनुसार प्रत्यक्ष अनुदान प्राप्त व्हावयाचे असल्यास आयुक्त यांनी योजना राबविणा-या विभाग प्रमुखांकडून वेळीच योजनांची अंमलबजावणी करून घेणे गरजेचे ठरते.

ई) **<u>संकीर्ण उत्पन्न</u>** :-

अपेक्षित :- 10,18,08,000/- रू.
प्रत्यक्ष :- 10,65,62,897/- रू.
फरक :- + 47,54,897/- रू.

संकीर्ण उत्पन्नाचे प्रमाण अपेक्षित उत्पन्नानुसार समाधानकारक असल्याचे दिसून येते.

**<u>एकूण महसुली जमा</u>** :-

अपेक्षित :- 1430009000/- रू.
प्रत्यक्ष :- 988417643/- रू.
फरक :- (-) 441591356/- रू.(अपेक्षित उत्पन्नाच्या 69% महसूल प्राप्त)

<u>एकूण भांडवली जमा</u> (क):-

अपेक्षित :- 1156022000/- रू.

(क) प्रत्यक्ष :- 00 रू.

फरक :- (-) 1156022000/- रू.(भांडवली जमा 0%)

यावरून असे दिसते की, अर्थसंकल्पात जरी जल:निसारण व पाणी पुरवठयाकरीता रू.115.60 कोटी निधी अपेक्षित गृहित धरला असला तरी प्रत्यक्ष निधी प्राप्त करून घेण्यात आलेला नसल्याचे दिसून येते.

<u>भांडवली जमा (अ)</u> :-

अपेक्षित :- 1729216000/- रू.

प्रत्यक्ष :- 1083625724/- रू.

फरक :- (-) 645590276/- रू.(अपेक्षित उत्पन्नाच्या 62.7% जमा)

भांडवली जमेच्या बाबतीत उत्पन्नाचे प्रमाण हे 62.7% असल्याचे दिसून येते.

**4.0 वार्षिक लेखे :- खर्च विभाग**

4.1 सामान्य प्रशासन विभागाकडील खच्र पाहता दूरध्वनी खर्च या लेखाशिर्षाखाली रू.31600/- अर्थसंकल्पिय तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च करण्यात आलेला असल्याचे वार्षिक लेख्यात नमूद आहे. तथापि प्रत्यक्ष सा.प्र.वि.कडील अनुदान नियंत्रण नोंदवहीची तपासणी केली असता खर्च हा मंजुर अनुदानापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

4.2 संगणक साहित्य खरेदी या लेखाशिर्षाखाली देखील रू.75159/- जास्तीचा खर्च झालेला असून संगणक विभागाकडून म.मनपा अधि.2011 चे कलम 86 चे उल्लंघन झालेले आहे.

4.3 जनगणना खर्च या लेखाशिर्षाखाली मंजुर तरतुदीपेक्षा रू.356236/- जास्तीचा खर्च करण्यात आलेला आहे.

4.4 नगरसचिव विभागाकडून मंजुर आर्थिक तरतुदीपेक्षा रू.176012/- जास्तीचा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते.

4.5 बुक बँक आस्थापना व जकात स्थायी आस्थापना खर्च देखील मंजुर तरतुदीपेक्षा जास्त करण्यात आल्याचे दिसून येते.

4.6 मानधन खर्च लेखाशिर्षांतर्गत रू.3909505/- इतका जास्तीचा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते.

4.7 आस्थापना खर्च (नव नियुक्ती) या लेखाशिर्षांतर्गत मंजुर अनुदानापेक्षा रू.4944349/- इतका जास्तीचा खर्च करण्यात आलेला आहे.

4.8 स्था.संस्था कर परतावा या लेखाशिर्षाखाली रू.2722295/- इतका जास्तीचा खर्च स्था.संस्था कर विभागाकडून करण्यात आल्याचे दिसून येते.

4.9 अग्निशमन विभाग - कन्सल्टंट फी या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानापेक्षा रू.49620/- जास्तीचा खर्च करण्यात आलेला आहे.

4.10 वर्कशॉप पेट्रोल डिझेल या लेखाशिर्षाखाली रू.2063060/- इतका खर्च मंजुर अनुदानापेक्षा जास्तीचा करण्यात आलेला आहे.

4.11 घनकचरा - वाहतूक संकलन या लेखाशिर्षाखाली रू.1462876/- रूपये मंजुर अनुदानापेक्षा जास्तीचा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते.

4.12 घनकचरा - नालेसफाई या लेखाशिर्षाखाली रू.579195/- मंजुर अनुदानापेक्षा विभाग प्रमुख यांनी जास्तीचा खर्च केल्यामुळे मनपा अधि.2011 चे कलम 86 चे उल्लंघन झाले आहे.

4.13 बांधकाम विभाग - प्रकल्प अहवाल तयार करणे या लेखाशिर्षांतर्गत मंजुर अनुदानापेक्षा रू.1292263/- जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. मंगल कार्यालय सेवा कर अंतर्गत रू.300877/- जास्तीचा खर्च करण्यात आल्याचे दिसून येतें. मनपा अधिनियम 2011 कलम 87 नुसार स्थायी समितीच्या शिफारशीअंती महासभेच्या मान्यतेने जास्त खर्च नियमित करून अनुपालन सादर करावे.

5.0 <u>एकूण महसूली खर्च (अ) :-</u>

अपेक्षित :- 1096529000/-
प्रत्यक्ष :- 874753249/-
तफावत :- (-) 221775751/-

<u>महसुली खर्च (क)</u>

अपेक्षित :- 256511000/-
प्रत्यक्ष :- 209584413/-
तफावत :- (-) 46926587/-

<u>भांडवली खर्च (अ)</u>

अपेक्षित :- 2022060000/-
प्रत्यक्ष :- 952041477/-
तफावत :- (-)1070018523/-

<u>भांडवली खर्च (क)</u>

अपेक्षित :- 1187923000/-
प्रत्यक्ष :- 2094382/-
तफावत :- (-)1185828618/-

अपेक्षित तरतुदीच्या प्रमाणात भांडवली खर्चाचे प्रमाण नगण्य आहे. यावरून अर्थसंकल्पिय तरतुदी वस्तुस्थितीस धरून नसल्याचे स्पष्ट होते. नियोजनपूर्वक योजना राबविणे आवश्यक ठरते.

6.0 <u>अर्थसंकल्प</u> :- म.शा.नगर विकास विभाग शा.नि.दि.6.7.2005नुसार महानगरपालिकांकरीता राष्ट्रीय म्युन्सिपल अकाउंट मॅन्युअल लागू केलेले असतानाही सन 2013-14 चा अर्थसंकल्प सदर मॅन्युअल मधील प्रकरण 33 नुसार विहित नमुने व लेखाशिर्ष सांकेतांकांचा वापर करून विहित नमुन्यात तयार करण्यात आलेला नाही.

7.0 <u>वार्षिक लेखा</u> :- सदरहू वार्षिक लेखा व्दिनोंद पध्दतीचे ठेवण्यात आला नसून मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करण्यात आलेले नाही. मा. आयुक्त यांनी स्था.संस्थेचा प्रमुख

या नात्याने सर्व संबंधित खाते / विभाग प्रमुख, उपायुक्त यांना विहित कालमर्यादा घालून देवून महानगरपालिकेची मत्ता निश्चित करणे, मालमत्ता नोंदवहया अद्यावत करून घेण आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही सुरू करून लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

मुख्यलेखापरीक्षक
अहमदनगर महानगरपालिका
अहमदनगर